ARTHA ( Commercial Weekly ) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख २५ मे, १९६० | अंक २१

## विविध माहिती

**दंडकारण्यासाठी नवे ट्रॅक्टर्स**—दंडकारण्य वसाहतीचा योजना झपाट्यानें पुरी करण्याच्या हेतूनें मध्यवर्ती सरकार नव्या प्रकारचे ट्रॅक्टर्स आयात करण्याचा विचार करीत आहे. नव्या ट्रॅक्टर्ससाठी व त्यांच्या यंत्रसामुग्रीसाठी १·३० कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे. त्यापैकी सुमारें ९५ लाख रुपयांची यंत्रसामुग्री अमेरिकेंतून आयात करण्यांत येईल.

**ब्रिटनमध्यें लोकमान्य टिळकांचें स्मारक**— भारतीय असंतोषाचे जनक म्हणून संबोधल्या गेलेल्या लोकमान्य टिळकांचें स्मारक लंडनमध्यें झालें आहे. लोकमान्य लंडनला ज्या घरांत वास्तव्य करीत असत तें घर आतां स्मारक-ट्रस्टनें विकत घेतलें आहे. ह्या घरांत तत्त्वज्ञान, संस्कृत वाङ्मय, भारताचा इतिहास, इत्यादि विषयांबाबत संशोधन करणारांसाठी एक ग्रंथालय स्थापन करण्यांत येणार आहे.

**रशिआ–इथिओपिआ करार**—रशिआ व इथिओपिआ ह्यांच्या दरम्यान खनिज तेलाबाबत एक करार झाल्याची वार्ता आहे. इथिओपिआंतील तेलाचें वांटप करण्याची योजना सरकारनें आपल्याकडे घ्यावी व तिच्यामार्फत रशिआचें तेल विकावें असें सुचविण्यांत आलें आहे. रशिआनें इथिओपिआसाठी एक तेलाचा कारखाना उभारण्याचेंहि अंगावर घेतलें आहे. रशिआ इथिओपिआला स्वस्त भावानें तेल पुरविणार आहे.

**राजस्थानांतील वाळवंटांत पाणी**—राजस्थानांतील वाळवंटाच्या खालील पाण्याचा शोध लावण्यासाठी भारत सरकारच्या अन्न व शेतकी खात्यानें ट्यूब विहिरी खोदण्याचें काम चालविलें होतें. जेसलमीर भागांतील अशा सहा विहिरींना मुबलक पाणी लागलें आहे. हें पाणी पिण्याला उपयोगी आहे. ह्या भागांत पिण्याच्या पाण्याचा फार तुटवडा आहे.

**कामगारांकरितां घरांची सोय**— तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत उत्तर प्रदेश सरकारनें कमी उत्पन्न असलेल्या कामगारांसाठी १३,६३० बिऱ्हाडांच्या जागा बांधण्याचें ठरविलें आहे. हीं बिऱ्हाडें राज्यांतील २५ प्रमुख शहरांतून बांधण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठी सरकारला ४·९६ कोटि रुपये खर्च करावे लागतील.

**विजेचीं रेल्वे-एंजनें**—चित्तरंजन येतील एंजिनांच्या कारखान्यांत परदेशीय तंत्रज्ञांच्या साह्यानें विजेवर चालणारीं रेल्वे एंजिनें तयार करण्यांत येणार आहेत. ह्या बाबतींत ब्रिटनमधील व इतर देशांतील कारखान्यांशीं रेल्वेबोर्डातर्फे लवकर बोलणीं चालू करण्यांत येणार आहेत.

**भाषा–गुजराती पण लिपी देवनागरी**— गुजरातच्या सरकारनें आपल्या कामकाजाची भाषा गुजराती ठरविली असली तरी भाषेसाठी वापरण्यांत येणारी लिपी मात्र देवनागरी राहणार आहे. देवनागरी लिपींतील टंकलेखन यंत्रांची मागणीहि कारखान्याकडे नोंदविण्यांत आली आहे. इंग्रजी ऐवजीं हिंदी भाषेचा उपयोग राज्य कारभारांत करणें सोपें जावें म्हणून देवनागरी लिपी स्वीकारण्यांत आली आहे.

**संततिनियमनासाठी गोळी**—अमेरिकेंतील एका औषधाच्या कारखान्यानें 'एनॉव्हिड' ह्या नांवाची एक संततिप्रतिबंधक गोळी तयार केली असून तिला अमेरिकन सरकारच्या औषध व अन्न खात्यानें मान्यता दिली आहे. ही गोळी तोंडानें घ्यावयाची असून डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणें वापरावयाची आहे. अमेरिकेंत तिची किंमत प्रत्येकी ५४ सेंट्स आहे.

**दक्षिण गुजरातेंत तेल**—भडोच जिल्ह्यांत अंकलेश्वरपासून ७ मैलांवर खनिज तेलाचा शोध चाललेला होता. ह्या ठिकाणीं खणण्यांत येत असलेल्या विहिरींत तेल सांपडलें आहे. विहिरींतून बाहेर आलेल्या तेलाचा दर्जा संबायत येथें सांपडलेल्या तेलापेक्षा अधिक चांगला आहे असें म्हणतात. दर तासाला १,८०० गॅलन इतक्या जोरानें तेल उफाळून वर येत होतें.

**केरळमधील सहकारी संस्था**— केरळमधील ताडी कामगारांच्या बहुतेक सहकारी संस्था लवकरच बंद करण्यांत येणार आहेत. फक्त ज्या संस्था ताडी विकण्याशिवाय अन्य कांहीं व्यवसाय करीत होत्या त्या मात्र बंद करण्यांत येणार नाहींत. परंतु अशा संस्था फार थोड्या आहेत. ताडी सहकारी संस्थांच्या गैरकारभाराबद्दल सध्यां चौकशी चालू आहे.

**सुखद हवा राखणारे आणखी डबे**—नवी दिल्ली ते मद्रास व नवी दिल्ली ते हौरा ह्या रेल्वेमार्गावर सुखद हवा राखणारा तिसऱ्या वर्गाचा आणखी एक डबा जोडण्यास सुरवात झाली आहे. आतां ह्या मार्गावर आठवड्यांतून दोनदां धांवणाऱ्या एक्सप्रेस गाड्यांवर आणखी २४० प्रवासी अशा प्रकारच्या डब्यांतून प्रवास करूं शकतील.

**कच्छमधील कोळशाचा सांठा**—कच्छमध्यें कमी प्रतीचा कोळसा सांपडेल किंवा काय हें पहाण्यासाठी १९६० च्या जानेवारींत सोव्हिएट तज्ज्ञांनीं तपासणी केली होती. त्यांनीं आपला अहवाल आतां मध्यवर्ती सरकारला सादर केला आहे. कच्छमध्यें कमी प्रतीचा कोळसा भरपूर असून त्याचा उपयोग विजेच्या उत्पादनासाठी करतां येईल असें अहवालांत म्हटलें आहे.

महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून
महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

( शिड्यूल्ड बँक ) **दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें** ( स्थापना १९३६ )

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. ( फोन नं. ६५६३ )
मुंबई शाखा :—८१ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. ( फोन नं. २५३४०८ )

: संचालक मंडळ :

श्री. छोटालाल धरमसी जोशी ( प्रोप्रायटर-कमलाकांत छोटालाल अँड को. ( इम्पोर्टर्स, एक्सपोर्टर्स मुंबई ) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे ( सुपरिंटेंडेंट, पैसाफंड कांच कारखाना ) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे ( डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चाकोलेट कं. लि. पुणें )
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे ( ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव )
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य ( इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर )
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई ( मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई )
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत ( प्रोप्रायटर, राम एजन्सी ) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत ( व्यापारी ) पुणें.


★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.

—बी. वाय्. पाठक, ॲ. मॅनेजर.

**किर्लोस्कर**
स्थापना १८८८

**इलेक्ट्रिक पंपिंग सेट**



भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतात. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.** किर्लोस्करवाडी ( द. सातारा )

# अर्थ

बुधवार, ता. २५ मे, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी बचत

भारताचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई ह्यांनीं तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम व त्यासाठी लागणारा पैसा ह्याविषयीं आपले विचार प्रगट केले आहेत. राष्ट्रीय बचतीबाबतच्या मध्यवर्ती सल्लागार बोर्डापुढें ते बोलत होते. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत अल्प-बचत योजनेच्या द्वारां लोकांनीं निदान ५५० कोटी रुपये तरी उभारणें आवश्यक आहे. भारताला जगांतील इतर देशांतील सरकारांकडून पाठिंबा व मदत मिळत आहे. त्यामुळें बाहेरची मदत मिळण्याच्या कामीं फारशी चिंता वाटण्याचें कारण नाहीं. खरी अडचण देशांतच पैसा उभा करण्याची आहे. बचतीची चळवळ ही एकसारखी चालणारी असली पाहिजे. त्याचप्रमाणें ती खेड्यापाड्यापर्यंत जाऊन पोंचली पाहिजे. कारण, संपत्ति खेड्यांतच मुख्यतः उत्पन्न होत असते. कार्यक्रमासाठी लागणारा पैसा देशांतल्या देशांत उभारावयाचा झाल्यास लोकांकडून होणाऱ्या बचतीचाच आधार घेतला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीनें आपणाला शक्य असणारी बचत करण्याचें ठरविलें तर देशांत बचतीस अनुकूल अशा प्रकारचें वातावरण उत्पन्न होण्यास मदत होते. बचत करण्याच्या योजनांवर रोजच्या रोज भर देण्यांत आला तर त्यांना एक प्रकारची स्वयंसिद्ध गति प्राप्त होते व मग त्या आपोआप चालू राहतात. त्यामुळें बचतीचा वेगहि वाढत जातो. भारत सरकारनें नुकतीच बक्षिसाच्या रोख्यांची योजना चालू केलेली आहे. ह्या योजनेमुळें अल्पबचत योजनेला अडथळे उत्पन्न होतील अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. पण असे अडथळे उत्पन्न होण्याचें कारण नाहीं. उलट, बक्षिसांच्या रोख्यांच्या योजनेनें अधिक पैसा सरकारच्या हातीं येईल.

## हौशी प्रवाशांच्या धंद्याचा विकास

भारतांत परदेशी व देशी हौशी प्रवाशांच्या धंद्याला उत्तेजन देण्यासाठी ५ कोटी रुपयांच्या रकमेची तरतूद तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत करण्यांत आली आहे. ज्या प्रेक्षणीय स्थळांना परदेशांतील प्रवासी विशेष करून भेट देतात तेथील सुखसोयींची वाढ करण्यासाठी वरील रकमेपैकी २·८ कोटी रुपयांची रक्कम खर्च करण्यांत येणार आहे. उरलेली २·२ कोटी रुपयांची रक्कम ज्या ठिकाणांना भारतामधील प्रवासी मोठ्या संख्येनें भेट देतात त्या ठिकाणीं सोयी निर्माण करण्यासाठी खर्च होणार आहे. ह्या धंद्याच्या वाढीसाठी सरकारला सल्ला देणारें एक मंडळ स्थापण्यांत आलेलें आहे. ह्या मंडळानें अशी शिफारस केली होती कीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत हौशी प्रवाशांच्या सुखसोयी वाढविण्यासाठी ११·३ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत यावी. पण तेवढी रक्कम ह्या कामासाठी मिळू शकली नाहीं. एकूण ५ कोटी रकमेपैकी ५० लाख रुपये जम्मू व काश्मीर येथील प्रवाशांना आकर्षित करणाऱ्या प्रेक्षणीय स्थळांवर खर्च करण्यांत येतील. ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचीं स्मारकें व राष्ट्रीय उद्यानें, ह्यांना जाण्यायेण्यासाठी नवे रस्ते बांधण्यांत येणार आहेत. त्याशिवाय प्रेक्षणीय स्थळांजवळील जागा अधिक सुंदर करणें, हौशीच्या मच्छीमारीची सोय करणें, जलपर्यटनाची सोय करणें, इत्यादि बाबींकडेहि लक्ष पुरविण्यांत येणार आहे. प्रेक्षणीय स्थळांजवळ असणाऱ्या धर्मशाळा व विश्रांतिगृहें पुष्कळदां चांगल्या परिस्थितींत नसतात. ह्या सोयी बहुधा खाजगी मालकीच्या असतात. खाजगी मालकीच्या ह्या संस्थांना मदत देण्यासाठी १० लाख रुपयांची सोय करण्यांत आली आहे. त्यामुळें आरोग्यकारक विश्रांतिस्थानें चालविणें त्यांच्या मालकांना सुलभ होणार आहे.

## सौराष्ट्रांतील स्त्रियांच्या आत्महत्त्या

आत्महत्त्या करणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण सौराष्ट्रांत सर्वांत अधिक आहे. सौराष्ट्रांत नेहमीं घडणारे हे लांछनास्पद प्रकार कमी करण्यासाठीं लवकरच कांहीं प्रयत्न करण्यांत येणार आहेत. पं. नेहरू राजकोटला गेले असतांना त्यांनीं ह्या प्रश्नाकडे सौराष्ट्रमधील सामाजिक कार्यकर्त्यांचें लक्ष वेधलें होतें. तथापि ह्या प्रश्नाला दुसरी एक चिंतनीय बाजू आहे. आत्महत्त्या म्हणून ज्या प्रकारांची नोंद करण्यांत येते ते प्रकार पुष्कळदां आत्मघाताचे नसून सरळ खुनाचे असतात, असा सामाजिक कार्यकर्त्यांचा दावा आहे. पुष्पाबेन मेहता ह्या स्त्री-कार्यकर्तीनें सौराष्ट्रांतील स्त्रियांच्या आत्मघातापैकीं ७० टक्के घटना उघड उघड खुनाचे प्रकार असतात असें मत व्यक्त केलें आहे. आत्महत्त्यांच्या प्रकारांची चौकशी करण्यासाठी पूर्वीच्या सौराष्ट्र सरकारनें एक कमिटी नेमली होती. कमिटीनें उपायहि सुचवावयाचे होते. कमिटीनें केलेल्या अहवालांत असें म्हटलें आहे कीं १९ ते ३० वर्षें वयाच्या स्त्रियांच्या गटांत ४५ टक्के आत्महत्त्या घडून आल्या. ३१ ते ५५ वर्षें वयाच्या स्त्रियांच्या गटांत २० टक्के आत्महत्त्या घडून आल्या. १२ टक्के आत्महत्त्या ५५ वर्षें वयापुढील स्त्रियांनीं केलेल्या आढळल्या आणि ८ टक्के आत्महत्त्या १३ ते १८ वर्षें वयाच्या गटांतील स्त्रियांनीं केलेल्या आढळल्या. खेड्यापेक्षा शहरांत आत्महत्त्येचें प्रमाण अधिक आढळलें. सर्वांत जास्ती आत्महत्त्या विहिरींत उडी टाकून करण्यांत आल्या. कुटुंबांत होणाऱ्या भांडण-तंट्यामुळें ३३ टक्के आत्महत्त्या घडून आल्या. लोकांच्या पुढील प्रश्न सोडविण्याबद्दल सल्ला देण्यासाठी ठिकठिकाणीं सल्लागार-केंद्रें उघडण्याचा उपाय सुचविण्यांत येत आहे.

## १०,००० रेल्वे स्लीपर्स पाकिस्तानांत वाहून गेले

चिनाब नदीच्या महापुरामुळें काश्मीर राज्यांतील ८ लक्ष रुपयांचीं १०,००० रेल्वे स्लीपर्सचीं लाकडें पाकिस्तानांत वाहून गेलीं. हीं लाकडें खाजगी व्यापाऱ्यांनीं बंदोबस्तांत ठेवलीं होतीं, पण पुराच्या पाण्यानें त्यास दाद दिली नाहीं.

### आय. ए. एस. मध्यें मद्रासचा उच्चांक

गेल्या दहा वर्षांत आय. ए. एस. व आय. पी. एस. मध्यें घेण्यांत आलेल्या ९६४ उमेदवारांपैकी सर्वांत ज्यास्त म्हणजे १८४ उमेदवार मद्रासमधील आहेत. त्या खालोखाल, १८२ उमेदवार उत्तर प्रदेशांतले आहेत.

१९४९ ते १९५८ ह्या मुदतींत आय. ए. एस. व आय. पी. एस. मध्यें उत्तीर्ण झालेल्यांची राज्यवार वांटणी खालीलप्रमाणें आहे:—

| राज्य | आय. ए. एस. | आय. पी. एस. |
|---|---|---|
| मद्रास | १३१ | ५३ |
| उत्तर प्रदेश | १०५ | ७७ |
| पंजाब | ५७ | ४३ |
| मुंबई | ५२ | २३ |
| आंध्रप्रदेश | १९ | १६ |
| आसाम | ७ | ८ |
| बिहार | २१ | ३० |
| जम्मू–काश्मीर | १ | ० |
| केरळ | २६ | २१ |
| मध्यप्रदेश | १८ | २३ |
| म्हैसूर | २८ | ६ |
| ओरिसा | १४ | १५ |
| राज्यस्थान | ११ | १५ |
| प. बंगाल | २९ | ३५ |
| दिल्ली | ४५ | ३५ |
| त्रिपुरा | ० | १ |
| हिमाचल प्रदेश | ० | १ |

### शिरगणतीसाठी २,००० टन कागद

१९६१ च्या शिरगणतीसाठी लागणारे फॉर्म्स वगैरे छापण्यास २,००० टन कागद लागेल. ५५ कोटी स्लिपा, ११ कोटी घरगुती माहितीचे तक्ते आणि २·२ कोटी इतर फॉर्म छापण्याचें काम कलकत्ता, अलिगड आणि नाशिक येथील छापखान्यांत चालू असून तयार फॉर्म सप्टेंबरमध्यें सेन्सस सुपरिंटेंडेंट्सना मिळतील. बहुतेक सर्व छपाई प्रादेशिक भाषेंतच करण्यांत येत आहे. अगदीं थोडे फॉर्म व प्रश्नावल्या इंग्रजींत आहेत. शिरगणतीसाठी १० लक्ष लोकांची नेमणूक केली जाईल. गणति केलेल्या प्रत्येक इसमामागें ३·५ नये पैसे इतका माफक खर्च झाला, तरी ह्या लोकांच्या मानवेतनासाठी १·६ कोटी रुपये लागतील. शिरगणतीचें काम २२ दिवस (१० फेब्रुवारी ते २ मार्च) चालेल.

### १९६५–६६ पर्यंत ३२,००० खेड्यांना व शहरांना वीजपुरवठा

दहा हजारांहून कमी लोकसंख्या असलेल्या १७,४०० खेड्यांत आणि छोट्या शहरांत १९६०–६१ मध्यें वीज खेळूं लागेल. याखेरीज, आणखी १५,००० खेड्यांत वीज नेण्याची हंगामी तरतूद तिसऱ्या योजनेच्या मसुद्यांत करण्यांत आली आहे. ही संख्या जमेस धरतां वीजपुरवठ्याची सोय असलेल्या खेड्यांची व शहरांची संख्या १९६५–६६ मध्यें ३२,४०० वर जाईल.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | २½ टक्के |
| २ वर्षें | २¾ टक्के |
| ३ वर्षें | ३ टक्के |
| ५ वर्षें | ३½ टक्के |
| १० वर्षें | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २. ता. ३१–७–५७ — वा. ग. आळतेकर, कार्यकारी संचालक

## भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४४)

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१–६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

(—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—)

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

रावसाहेब य. द. खोले — श्री. चं. रा. राठी

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंडुके

## सहकारी संस्थांवरील प्राप्तीकर

### अनेक प्रकारच्या संस्थांना सूट

सन १९२२ च्या भारतीय प्राप्तीकर कायद्यांतील १९६० च्या फायनान्स ॲक्टान्वयें दुरुस्त केलेल्या तरतुदींसाठी निरनिराळ्या सहकारी संस्थांच्या व्यवहारांवरील नफ्यावर प्राप्तीकर आकारण्याबाबतची परिस्थिति पुढीलप्रमाणें आहे:—

**१. प्राप्तीकर आकारणींतून वगळण्यांत आलेल्या सहकारी संस्था :**

( अ ) बँकिंगचा व्यवहार करणारी किंवा आपल्या सदस्यांना कर्ज देणारी संस्था; यांत पुढील संस्थांचा अंतर्भाव आहे :— ( १ ) प्राथमिक पतपेढी, ( २ ) जिल्हा व मध्यवर्ति सहकारी बँका, ( ३ ) केंद्र सहकारी बँका, ( ४ ) लॅण्ड मॉर्गेज बँका, ( प्राथमिक तसेंच मध्यवर्ती ), ( ५ ) अर्बन बँकेसारख्या बिगर शेतकी पत संस्था, ( ६ ) कामगारांच्या पतपेढ्या व बचत संस्था इत्यादि.

( आ ) कुटीरोद्योग करणारी संस्था.

( इ ) ( १ ) आपल्या सदस्यांच्या शेतमालाच्या विक्री-व्यवहाराची व्यवस्था पाहणारी संस्था. यांत प्राथमिक, मध्यवर्ती व राज्य विक्री संस्थांचा अंतर्भाव होतो. ( २ ) शेतकी अवजारें, बी-बियाणें, जनावरें किंवा शेतकीसाठी लागणाऱ्या इतर वस्तु यांचा, आपल्या सदस्यांना पुरवठा करण्यासाठीं खरेदी करणारी संस्था.

( ई ) आपल्या सदस्यांच्या शेतमालावर विजेचा वापर न करतां प्रक्रिया करणारी संस्था. यांत भात सडणाऱ्या संस्था, तेल घाणी, इत्यादींचा समावेश होतो.

( उ ) प्राथमिक दूध संस्था. आपल्या सदस्यांकडून गोळा करण्यांत आलेल्या दुधाचा संयुक्त दूध सहकारी संस्थेस पुरवठा करणारी संस्था.

वर उल्लेख केलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या संस्थांनीं वर नमूद केलेल्या कार्याव्यतिरिक्त कांहीं कामें अंगिकारल्यास त्यांना अशा नव्या व्यवहारांत १५,००० रुपयांहून अधिक नफ्यावर प्राप्तीकर भरावा लागेल.

**२. प्राप्तीकर आकारणींतून अंशतः वगळण्यांत आलेल्या संस्था :—**

( अ ) क्रमांक १ खाली निर्देशिलेल्या सहकारी संस्था वगळून इतर संस्था.

क्रमांक एक खाली उल्लेखिलेल्या सहकारी संस्था सोडून इतर सहकारी संस्थांनीं मिळविलेल्या १५,००० रुपयांपर्यंतच्या नफ्यावर प्राप्तीकर आकारण्यांत येणार नाहीं. म्हणजे वाहतूक सहकारी संस्था, घरबांधणी संस्था यांचा नफा १५,००० रुपयांहून जास्त झाल्यास त्यांना त्या रकमेवर प्राप्तीकर भरावा लागेल.

( आ ) विजेच्या साहाय्यानें प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्था.

सहकारी साखर कारखाने, स्पिनिंग मिल, कापसांतील सरकी काढणाऱ्या गिरण्या, तेल गिरण्या, द्रावण, अर्क कारखाने इत्यादि यासारख्या औद्योगिक व्यवहारांत, गुंतविलेल्या भांडवलावर मध्यवर्ती महसूल मंडळानें ठरवून दिलेल्या नियमान्वयें हिशेब करून आलेल्या दरसाल दरशेंकडा ६ टक्क्यांपर्यंतच्या नफ्यावर प्राप्तीकर आकारणी केली जाणार नाहीं. ही कर आकारणी करतांना या संस्थेनें प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ केल्या नंतरच्या पुढील आर्थिक वर्षांतील नफ्यावर वा त्यानंतरच्या लगोलग सहा आकारणीच्या वर्षी लागू केली जाणार नाहीं. मात्र प्राप्तीकर कायद्यांतील १५ सी कलमांतील अटी पुऱ्या केलेल्या हव्यात.

( इ ) ग्राहक सहकारी संस्था.

वस्तूंची घाऊक खरेदी करून त्या आपल्या सदस्यांना विकणाऱ्या व त्यांनीं केलेल्या खरेदीवर त्यास रिबेट दिला तर त्यासाठी खर्च झालेली रक्कम एकूण नफ्यांतून वगळतां येईल.

प्राप्तीकराच्या आकारणीबाबत या सवलती दिल्यानें सहकारी संस्थांना आपल्या साधनसंपत्तींत भर टाकून आपल्या संघटना भक्कम पायावर उभारतां येऊं शकतील अशी आशा सरकारला वाटते. सरकारनें दिलेल्या या सवलतीं केवळ पात्र संस्थांनींच घ्याव्यात आणि बनावट सहकारी संस्था त्याचा लाभ उठवत नाहींत हें पाहणें फार महत्त्वाचें आहे.

---

## बँकिंग ट्रायब्यूनलवर नोकरांचा बहिष्कार

भारत सरकारनें गेल्या मार्चमध्यें नेमलेल्या नॅशनल बँक्स ट्रायब्यूनलवर बहिष्कार घालण्याचें ऑल इंडिया स्टेट बँक ऑफ इंडिया स्टॅफ फेडरेशनच्या कौन्सिलनें ठरविलें आहे. कारण "स्टेट बँकेच्या नोकरांवर हें ट्रायब्यूनल लादण्यांत आलें आहे. नोकरांना बँकेच्या चालकांशींच वाटाघाटी करावयाच्या आहेत, किंवा खुषीच्या लवादांकरवीं तंट्याचा निवाडा करून घेण्यास ते तयार आहेत." स्टेट बँक, रिझर्व्ह बँक, खासकट सबंध बँकिंगच्या व्यवसायांतील सर्व तंट्यांच्या निवाड्यासाठी सरकारनें ट्रायब्यूनल नेमलें, त्यानंतर स्टेट बँकेच्या नोकरांनीं संप समाप्त करून ते कामावर रुजू झाले होते. आतां त्या ट्रायब्यूनलवर बहिष्कार घालण्यांत येणार आहे.

---

## कै. मोतिचंद शहा

सुप्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर आणि मुंबईचे माजी शेरीफ, श्री. मोतिचंद जी. शहा हे वयाच्या ६४ व्या वर्षी महाबळेश्वर येथें दि. २१ रोजीं हृदयविकारानें मृत्यु पावले. फर्ग्युसन कॉलेजांतून तत्त्वज्ञान ह्या विषयाची त्यांनीं पदवी-परीक्षा मिळवून ते वालचंद उद्योगसमूहांत दाखल झाले व पुढें स्वतंत्र उद्योग करूं लागले. ते कै. शेठ वालचंद हिराचंद ह्यांचे जावई होते. त्यांनीं १० लक्ष रुपयांपेक्षा जास्त देणग्या दिलेल्या आहेत.

---

## "अमेरिकेनें धान्याबरोबर संततिनियमाच्या गोळयाहि पाठवाव्यात"

हिंदी लोकसंख्येच्या बेसुमार वाढीस आळा घालण्यास अमेरिकेनें संततिनियमन घडवून आणणाऱ्या तोंडानें खावयाच्या स्वस्त गोळ्या पुरवाव्या, असें श्री. एम. सी. छगला ( वॉशिंग्टन येथील भारताचे वकील ) ह्यांनीं आपल्या एका भाषणांत अमेरिकेला विनविलें आहे. औद्योगिकरणासाठी अमेरिका भारताला प्रचंड मदत करीत आहे, तिचा खरा उपयोग हिंदी लोकसंख्येची वाढ रोखून धरली तरच होईल, असें ते म्हणाले. भारताचा अभ्युदय व्हावा अशी अमेरिकेची इच्छा असेल, तर अमेरिकेनें आर्थिक मदत देऊन स्वस्त बसून चालणार नाहीं. लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यासहि तिनें मदत केली पाहिजे. सध्यांचें जननाचें दर हजारी वार्षिक ४० हें प्रमाण निम्म्यावर आणून ठेवायला हवे; पण कुटुंबनियोजनाचा आणि संततिनियमनाचा प्रसार करणें अतिशय कठीण काम आहे.

# THE BHARAT INDUSTRIAL BANK

BALANCE SHEET AS

| 31-12-1958 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | 31-12-1959 Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| | *Authorised Capital* | | |
| 43,560 | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560—00 | |
| 15,00,250 | 30005 Ordinary Shares of Rs 50/- each ... | 15,00,250—00 | 15,43,810—00 |
| 15,43,810 | | | |
| | *Issued and Subscribed Capital:* | | |
| 43,560 | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares of Rs. 40/- each ... | 43,560—00 | |
| 7,50,250 | 15005 Ordinary Shares of Rs. 50/- each ... | 7,50,250—00 | 7,93,810—00 |
| 7,93,810 | | | |
| | *Called and Paid up Capital:* | | |
| 27,225 | 1089 6% Cumulative (Redeemable after 5 years) Preference Shares @ Rs. 25/- each ... | 27,225—00 | |
| 3,75,250 | 15005 Ordinary Shares @ Rs. 25/- each (out of which 5 shares are fully paid) ... | 3,75,250—00 | |
| 4,02,475 | | 4,02,475—00 | |
| 2,280 | Less calls unpaid ... | 2,220—00 | |
| 4,00,195 | | 4,00,255—00 | |
| Nil | Add Forfeited Shares ... | Nil | 4,00,255—00 |
| 290 | *Calls in Advance:* ... | | 290—00 |
| 1,25,000 | **2. Reserve Fund and Other Reserves:** ... | | 1,38,000—00 |
| | **3. Deposits and Other Accounts** | | |
| 30,18,126 | Fixed Deposits & Recurring Deposits ... | 32,04,703—27 | |
| 26,15,672 | Savings Bank Deposits ... | 30,36,708—64 | |
| 14,42,922 | Current Accounts, Contingency Accounts etc. ... | 14,20,908—83 | 76,62,320—74 |
| 70,76,720 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** ... | | |
| Nil | (i) In India ... | 2,06,231—21 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | 2,06,231—21 |
| | **Particulars** | | |
| Nil | (i) Secured (against Pledge of G. P. Notes) ... | 2,01,059—27 | |
| Nil | (ii) Unsecured ... | 5,171—94 | |
| 20,456 | **5. Bills Payable** ... | | 50,042—11 |
| | **6. Bills for Collection being Bills Receivable as per Contra:** ... | | |
| 2,24,119 | (i) Payable in India ... | 2,42,964—62 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 2,42,964—62 |
| 2,24,119 | | | |
| 65,905 | **7. Other Liabilities** ... | — | 83,237—00 |
| Nil | **8. Acceptances, Endorsements and other obligations as per Contra:** ... | | 22,000—00 |
| | **9. Profit and Loss Account** | | |
| 25,114 | Profit as per last Balance Sheet. | 31,860—54 | |
| | Less Appropriations | | |
| 6,000 | Reserve Fund. 7,000—00 | | |
| 2,000 | Investment Depreciation Fund 5,000—00 | | |
| ... | Contingency Fund 1,000—00 | | |
| 1,225 | Dividend @ 6% on 6% C. R. P. Shares 1,225—00 | | |
| 12,625 | Income tax paid 17,635—54 | 31,860—54 | |
| 21,850 | | | |
| | Profit brought from the Profit and Loss Account ... | ... | |
| 31,860 | Add Profit for the year (subject to income-tax for one year) ... | 41,447—93 | 41,447—93 |
| 79,44,545 | C. F. | | 88,47,289—41 |

# LIMITED, POONA CITY.

**AT 31st DECEMBER, 1959**

| 31-12-1958 | PROPERTY & ASSETS | | 31-12-1959 |
|---|---|---|---|
| | | Rs. nP. | Rs. nP. |
| | **1. Cash** | | |
| 7,22,590 | In hand and with Reserve Bank and State Bank (Including foreign currency notes) ... | | 4,80,884—23 |
| | **2. Balances with other Banks** (In Current Accounts) | | |
| 4,70,130 | (i) In India ... | 3,22,240—27 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | 3,22,240—27 |
| 4,70,130 | | | |
| 6,00,000 | **3. Money at Call and Short Notice** ... | | 8,00,000—00 |
| | **4. Investments at cost** ... | | |
| | Govt. Securities of the face value of Rs. 28,40,100/– | | |
| | (i) Securities of the Central and State Governments and other trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments. | | |
| 24,95,897 | (Market Value Rs. 25,52,107—25) ... | 28,05,685—50 | |
| | (ii) Shares–Ordinary (at cost) | | |
| 99,718 | (i) Fully Paid (Market value Rs. 1,38,840–50) | 1,30,303—00 | |
| Nil | (ii) Partly Paid ( " Rs. 11,250–00) | 11,250—00 | |
| 54,752 | (iii) Debentures or Bonds ( " Rs. 63,200–00) | 63,357—50 | |
| Nil | (iv) Other Investments ... | Nil | |
| Nil | (v) Gold ... | Nil | 30,10,596—00 |
| 26,50,367 | | | |
| | **5. Advances** (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors). | | |
| | (1) Loans, Cash Credits, Overdrafts etc. | | |
| 24,35,361 | (i) In India 30,76,598—24 | | |
| Nil | (ii) Outside India Nil | 30,76,598—24 | |
| | (2) Bills Discounted and Purchased (Excluding Treasury Bills of the Central and State Governments). | | |
| 2,57,133 | (i) Payable in India 3,21,731—06 | | |
| Nil | (ii) Payable outside India Nil | 3,21,731—06 | 33,98,329—30 |
| | **Particulars of Advances** | | |
| 16,73,085 | (i) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | 23,54,172—24 | |
| 3,61,898 | (ii) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the Debtors' Personal Security. ... | 3,77,853—52 | |
| 4,93,051 | (iii) Debts considered good and Secured by the Personal Liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtors | 5,04,198—68 | |
| | | 32,36,224—44 | |
| 1,64,460 | (iv) Debts considered doubtful or bad, not provided for | 1,62,104—86 | |
| 26,92,494 | | 33,98,329—30 | |
| 43,748 | (v) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 61,980—78 | |
| Nil | (vi) Debts due by Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies, as Members. ... | 27,439—17 | |
| 89,511 | (vii) Maximum total Amount of Advances including Temporary Advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 64,468—46 | |
| | C. F. | | 80,12,049—80 |

# THE BHARAT INDUSTRIAL BANK

BALANCE SHEET AS

| 31-12-1958 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | 31-12-1959 Rs. nP. |
|---|---|---|---|
| 79,44,545 | B. F. ... | | 88,47,289—41 |
| | 10. Contingent Liabilities ... | | |
| | (i) On partly paid shares of Joint stock Companies Rs. 18,750—00 | | |
| | (ii) In respect of partly paid shares held by the Bank on behalf of constituents Rs. 2,250—00 | | |
| 79,44,545 | Total Rs. ... | | 88,47,289—41 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED ON 31st DECEMBER, 1959.

| 31-12-1958 | EXPENDITURE | Rs. nP. | 31-12-1959 Rs. nP. |
|---|---|---|---|
| 1,86,008 | 1 Interest paid on deposits, Borrowings etc. ... | | 2,04,968—90 |
| | 2 Salaries and Allowances and Provident Fund :— (including mount paid to Managing Directors and Manager Rs. 9,281—16) ... | | |
| 1,07,055 | (Previous year Rs. 14,767—44) ... | | 1,06,998—06 |
| 840 | 3 Directors' and Local Committee Members' Fees and Allowances. ... | | Nil |
| 13,473 | 4 Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. ... | | 15,238—20 |
| 550 | 5 Law Charges. ... | | 396—24 |
| 6,553 | 6 Postage, Telegrams and Stamps ... | | 6,842—72 |
| 700 | 7 Auditors' Fees ... | | 700—00 |
| 7,303 | 8 Depreciation on and repairs to the Banking Company's Property. ... | | 7,150—99 |
| 5,993 | 9 Stationery, Printing, Advertisements etc. ... | | 10,510—95 |
| 424 | 10 Loss from sale or dealing with non-banking assets. ... | | 474—38 |
| Nil | 11 Loss on sale of investments in Govt. Securities ... | | Nil |
| 5,673 | 12 Other Expenditure. ... | | 7,522—66 |
| 28,596 | 13 Balance of Profit (Subject to Income-tax for 1 year)... | | 41,447—93 |
| 3,63,168 | Total Rs. ... | | 4,02,251—03 |

| 31-12-1958 | INCOME (Less provision made during the year for Bad and Doubtful debts and other usual or necessary provisions). | Rs. nP. | 31-12-1959 Rs. nP. |
|---|---|---|---|
| 3,24,380 | 1. Interest and Discount. ... | | 3,52,598—11 |
| 15,822 | 2. Commission, Exchange and Brokerage :— ... | | 22,878—40 |
| 11,468 | 3. Rent. ... | | 12,967—88 |
| Nil | 4. Net Profits on sale of Investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserves or any particular Fund or Account). ... | | Nil |
| Nil | 5. Net profit on revaluation of Investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserves or any particular Fund or Account.) ... | | Nil |
| 2,116 | 6. Income from Non-banking assets and profit from sale of or dealing with such assets. ... | | 1,422—00 |
| 9,382 | 7. Other Receipts. | | 12,384—64 |
| 3,63,168 | Total Rs. ... | | 4,02,251—03 |

## AUDITOR'S REPORT

We have audited the attached Balance Sheet of the Bharat Industrial Bank Limited, as of 31st December, 1959 and the Profit and Loss Account annexed for the year ended on that date, in which are Incorporated the unaudited returns of six Branches not visited by us.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to sub-sections (1) and (2) of section 211 and sub-section (5) of sections 211 and 227 section (5) of the Companies Act, 1956, the Balance-Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with the Sixth Schedule of the Companies Act, 1956. The Accounts are therefore drawn up in conformity with Form A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that :—

(a) Reference is invited to paragforaph 4 of Directors' Report.

(b) We have obtained all the in rrmation and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary fo the purpose of our audit and have found them to be satisfactory;

(c) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank ;

(d) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches of the bank ;

# LIMITED, POONA CITY.

**AT 31st DECEMBER, 1959**

| 31-12-1958 | PROPERTY & ASSETS | | 31-12-1959 |
|---|---|---|---|
| | | Rs. nP. | Rs. nP. |
| | B. F. ... | | 80,12,949—80 |
| Nil | (viii) Maximum total amount of Advances, including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents or in the case of private companies, as Members ... | 27,439—17 | |
| Nil | (ix) Due from Banking Companies ... | Nil | |
| | **6. Bills Receivable, being Bills for Collection** as per contra. | | |
| 2,24,119 | (i) Payable in India ... | 2,42,964—62 | |
| Nil | (ii) Payable outside India ... | Nil | 2,42,964—62 |
| Nil | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and other Obligations (per Contra)** ... | | 22,500—00 |
| | **8. Premises (at cost)** | | |
| 3,76,823 | As per last Balance Sheet ... | 3,76,823—17 | |
| Nil | Additions during the year ... | Nil | |
| 3,76,823 | | 3,76,823—17 | |
| 31,895 | Less Depreciation upto 31-12-1959 ... | 35,553—00 | 3,41,270—17 |
| 3,44,928 | | | |
| | **9. Furniture and Fixtures (At Book value)** | | |
| 62,396 | As per last Balance Sheet ... | 63,310—80 | |
| 940 | Additions during the year ... | 624—25 | |
| 63,336 | | 63,935—05 | |
| 25 | Less: sales during the year ... | Nil | |
| 63,311 | | 63,935—05 | |
| 19,330 | Less Depreciation upto 31-12-1959 ... | 22,005—92 | 41,929—13 |
| 43,981 | | | |
| | **Safe Deposit Vault Equipment (at cost)** | | |
| 37,080 | As per last Balance Sheet ... | 37,080—12 | |
| Nil | Additions during the year ... | Nil | |
| 37,080 | | 37,080—12 | |
| 4,414 | Less Depreciation upto 31-12-1959 ... | 5,230—38 | 31,849—74 |
| 32,666 | | | |
| | **10. Other Assets Including Silver** | | |
| 6,711 | Sundry Assets ... | 6,044—88 | |
| 27,488 | Interest accrued on Investments ... | 29,114—06 | |
| 44,241 | Income-Tax deducted at source ... | 33,894—97 | |
| 24,612 | Stock of Printing (at cost) ... | 23,935—25 | |
| 607 | Library (at cost) ... | 650—30 | |
| 643 | Stamps in stock ... | 714—36 | |
| 8,491 | Branch adjustments ... | ... | |
| 17,461 | Due from Bank in liquidation (not provided for) ... | 17,460—56 | |
| 2,118 | Pre-paid expenses ... | 4,185—05 | |
| | Refund on Income-tax ... | 7,829—77 | 1,23,829—20 |
| 1,32,372 | | | |
| 30,897 | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims (Market Value)** ... | | 30,896—75 |
| 79,44,545 | Grand Total Rs. .. | | 88,47,289—41 |

(e) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns;

(f) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts (together with the Directors' Report annexed thereto) give the information required by the Companies Act, 1956, in the manner so required for Banking Companies, and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of the affairs of the Bank as at 31st December, 1959, and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended upon that date.

Bombay,
7th February, 1960.

KHARE & Co.,
Chartered Accountants.

M. K. Kulkarni, Accountant.
N. N. Kshirsagar, Assistant Manager
R. B. Salvekar, Manager.
K. P. Joshi, Chairman.
K. M. Mahajan, Vic-Chairman.

B. B. Walvekar,
Mrs. Indumatibai R. Phadake,
R. P. Damodare,
R. B. Girme,
N. P. Kalkar,
M. J. Patel.
Directors

# THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED, POONA CITY.

## 22nd Report of the Directors.

(1) The Directors beg to submit to the share holders the Balance Sheet and Profit and Loss Account of the Bank for the year ended 31st December, 1959.

(2) It will be seen that the transactions of the Bank during the year under report resulted in a net profit of Rs. 41,447—93 nP., which your Directors recommend be appropriated as under :—

| | |
|---|---|
| To Reserve Fund ( As required by Sec. 17 of the Banking Companies Act 1949 ) | ... Rs. 8,500–00 |
| To Investment Depreciation Fund | ... Rs. 3,000–00 |
| To Dividend @ 6% on 6% C. R. P. Shares ( Taxable ) | ... Rs. 1,634–00 |
| To Dividend @ 3% on Ordinary Shares ( Taxable ) | ... Rs. 11,157–00 |
| To Provision for taxation | ... Rs. 17,000–00 |
| To Balance to be carried forward to the next year | ... Rs. 156–93 |
| | Rs. 41,447–93 |

(3) The business of the Bank during the year under report was satisfactory. Deposits with the Bank have shown an increase of more then Rupees Six lacs. The Branches of the Bank are working satisfactorily and it may be noted from the Balance Sheet that there was an all round progress in the working of the Bank during the year under report.

(4) You will recall that as per the last Balance Sheet, the balance of profits of the Bank as on 31st December, 1958 was subject to taxation for two years viz. 1957 and 1958. The said Balance was utilised for meeting the total tax liability for the year 1957 and a part of the tax liability for the year 1958. The Directors have therefore utilised a sum of Rs. 12,460 from contingency account to meet the balance of the tax liability for the year 1958. Thus as on 31st December, 1959, there is no outstanding liability in respect of taxation.

(5) During the year under report both the Managing Directors Shri. R. B. Salvekar and Shri. N. N. Kshirsagar resigned their seats on the Board from 1st July 1959. The Board has appreciated the services they rendered to the Bank as Managing Directors of the Bank since the very inception of the Bank.

(6) During the year under report Shri. N. P. Kelkar of M/s. Kelkar Bros. Poona, and Shri. Meru Jaffer Patel, Poona, were co-opted on the Board of Directors. They retire under article 106 but are eligible for election and offer themselves for the same.

(7) Unnder Article 113 of the Articles of Association three of the Directors Shri. K. P. Joshi, Shri. B. B. Walvekar and Shri. R. B. Girme retire by rotation. They are eligible for re-election and offer themselves for the same.

(8) You are requested to appoint Auditors and fix their remuneration.


(9) The Directors place on record their deep sense of gratitude and thankfully acknowledge the valuable assistance rendered by the members of the Local Advisory Boards of Branches. They are as well glad to appreciate the services rendered by the staff.

On behalf of the Board,
K. P. Joshi,
*Chairman.*

Poona,
Date 6-2-1960

### यंत्रसामग्रीच्या उत्पादनावर वाढता भर

भारत–सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं मुंबई येथें एका प्रसंगीं बोलतांना पंचवार्षिक कार्यक्रमांतील औद्योगीकरणाच्या कामाचा आढावा घेतला. आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतांत तयार करण्यांत आलेली यंत्रसामग्री वापरून पोलादाचा कारखाना उभारतां येईल असा विश्वास आतां वाटूं लागला आहे. १९४७ पासून दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या प्रारंभापर्यंतच्या कालांत भारताच्या पुढाऱ्यांनीं देशांत औद्योगीकरणाला अनुकूल असें वातावरण निर्माण करण्यांत यश मिळविलें. आज खाजगी मालकीचा विभाग आणि सार्वजनिक मालकीचा विभाग हे दोन्हीहि विभाग अत्यंत कार्यक्षमतेनें व मनापासून आपआपला कार्यभाग करीत आहेत. त्यामुळें देशाच्या प्रगतीचा वेग लक्षांत भरण्यासारखा वाढला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत औद्योगिक यंत्रसामग्री तयार करण्यावर अधिक भर देणें क्रमप्राप्तच आहे. ह्या कार्यक्रमाच्या अखेरीस भारतांत २०० कोटी रुपये किंमतीची यंत्रसामग्री तयार करण्यांत येईल असा अंदाज आहे. चौथ्या आणि पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारत आपल्या औद्योगीकरणाच्या तिसऱ्या अवस्थेंत प्रवेश करील. ह्या कालांत हिंदी एंजिनिअर्स भारतांत तर काम करतीलच; पण परदेशांतहि काम करण्याची संधि त्यांना मिळूं लागेल. त्याचप्रमाणें भारतीय यंत्रशास्त्रज्ञ नव्या प्रकारची यंत्रसामग्री बनविण्याचे कामहि करूं लागतील व ती भारतप्रमाणेंच इतर देशांतहि वापरली जाऊं लागेल. भारतीय इंजिनिअर्सनीं आतांपासूनच नव्या नव्या प्रकारची यंत्रसामग्री निर्माण करण्याकडे लक्ष दिलें पाहिजे.

आज बाजारांत अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूनांच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यांवरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पतीयुक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनीं प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.

आर्य-वैद्यकाच्या इतिहासांतील महत्वाचें पान



१८९९-१९६०

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि. हीरक महोत्सव

# आधुनिक पांडवांचे आयुर्वेदासाठी भगीरथ प्रयत्न

## सांडू बंधूंच्या उद्यमाचें सुमधुर फळ

### दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर (प्रा.) लि. चा हीरकमहोत्सव

[ दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि. या आयुर्वेदीय औषधें तयार करणाऱ्या कारखान्याचा हीरक महोत्सव दि. ९ ते ११ मे असे तीन दिवस सांडूवाडी चेंबूर मुंबई येथें मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. या समारंभाला अध्यक्ष म्हणून नाम. श्री. काकासाहेब गाडगीळ (राज्यपाल पंजाब) व बक्षिस समारंभाचे अध्यक्ष म्हणून नाम. श्री. बाळासाहेब भारदे (मंत्री सहकार विभाग) हे लाभले होते. याच उत्सवाचे वेळीं दि. ११ मे रोजीं नाम. यशवंतराव चव्हाण (मुख्य मंत्री मुंबई राज्य) यांचे हस्तें संस्थेच्या संशोधन शाळेचें उद्घाटन करण्यांत आलें. ]

सांडू घराणें मूळचें रत्नागिरी जिल्ह्यांतील तिवरें या गांवचें. प्रस्तुत सांडू बंधूंच्या वडिलांचें नांव कृष्णाजीपंत असून आजोबा रघुनाथपंत या नांवानें प्रसिद्ध होते. नेहमींच्या संवयीनुसार केवळ परोपकारबुद्धीनें कृष्णाजीपंत कोणास तरी जामीन राहिले. या प्रकरणीं त्यांचा विश्वासघात होऊन त्यांना पांच ते सहा हजार रुपयांचा भुर्दंड बसला. तेव्हांपासून या कुटुंबाच्या हालअपेष्टांस सुरुवात झाली. कृष्णाजीपंतांच्या दत्तात्रेय, रघुनाथ, वासुदेव, हरि आणि गोविंद या पांचहि मुलांना आपलें पोट पाठीशीं बांधून मुंबई गांठणें भाग पडलें. मुंबईस येऊन वडिलांच्या स्नेह्यांच्या आधारानें त्यांनीं कमिशन एजन्सीचा धंदा सुरू केला. तो करीत असतां इतर मालाबरोबर देशी व विलायती औषधेंहि त्यांना मुंबईहून परगांवच्या व्यापाऱ्यांना पाठवावी लागत.

इतरांनीं बनविलेलीं औषधें विकीत जिणें जगण्यापेक्षा स्वतः औषधें तयार करून त्यांची विक्री करण्याचे विचार दत्तात्रेय कृष्ण यांच्या मनांत येणें अगदीं अपरिहार्यच होतें. पण आयुर्वेदीय औषधी तयार करण्याचा कारखाना काढण्याची कल्पना तडीस नेणें हें त्यावेळीं कांहीं 'येरा गबाळाचें काम' नव्हतें. कारण तो अव्वल इंग्रजी आमदानीचा काळ होता. विपुल द्रव्यबलासाठीं अडून न बसतां, अत्यंत धीमेपणानें पण खंबीर रीतीनें कारखाना चालवावयाचा अशा कृतनिश्चयानें श्री. दत्तात्रय कृष्ण यांनीं दि. १० मे १८९९ रोजीं ठाकुरद्वार येथें श्री. गंगारामशेट खत्री यांच्या वाडींत या कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. अशा रीतीनें सांडू बंधू औषधिविक्रेत्याचे औषधिनिर्माते झाले !

### यशांत कुटुंबांतील स्त्रियांचा वांटा

वनस्पती व काष्ठौषधी मुंबईत विकत घेणें आर्थिक दृष्ट्या शक्य नसल्यानें श्री. दत्तात्रय कृष्ण यांचे धाकटे बंधु श्री. रघुनाथ कृष्ण यांनीं कोंकणांतील दुर्मिळ पण उपयुक्त वनस्पती व काष्ठौषधी जातीनें दऱ्याखोऱ्यांत जाऊन आणण्याची जबाबदारी अंगिकारली. कारखान्यांत कामासाठीं सर्वत्र मजूर ठेवणें आर्थिक दृष्ट्या सोयीचें नसल्यानें व या कामासाठी समजूतदार मजूर मिळणेंहि सहज शक्य नसल्यानें या कारखान्यांतील शारीरिक श्रमांचीं बहुतेक सर्व कामें सुरुवातीस सांडू बंधु व सांडू कुटुंबांतील स्त्रियांनींच केलीं. विशेषतः वनस्पती निवडून साफसूफ करून ठेवणें, कुटणें, भुकटी करणें, खलणें, पुटें देणें, गोळ्या तयार करणें, भट्टीवर देखरेख करणें इत्यादि सर्व कष्टाचीं कामें सांडू कुटुंबांतील स्त्रियाच प्रामुख्यानें करीत. द्रव्यबळाची उणीव अशा प्रकारें शारीरिक श्रमानें भरून काढून कारखाना ऊर्जितावस्थेस आणावयाचा ही ईर्षा मनांत बाळगून सांडू कुटुंबांतील सर्व स्त्रिया झटल्या. अशा रीतीनें कारखान्यांतील वनस्पती निवडण्यापासून तों औषधिनिर्मितीपावेतोंच्या अंतर्गत कामाचा बराचसा कार्यभाग सांडू कुटुंबांतील स्त्रियांनींच सांभाळल्यामुळें शास्त्रशुद्ध औषधीनिर्मिति तर झालीच पण त्याबरोबर दुसरा मोठा फायदा म्हणजे सांडू बंधूंना कारखान्याबाहेरील इतर कामें म्हणजे मालाची खरेदी, विक्री, प्रचार, गिऱ्हाइकांच्या भेटीगांठी इत्यादी साठीं भरपूर वेळ मिळाला. सांडू बंधूंच्या कारखान्याच्या यशांत सांडू कुटुंबांतील स्त्रियांचा वांटा निःसंशय फारच मोठा आहे. सर्वार्थानें त्या सहधर्मचारिणी होत्या.

### ध्येयवादी विचार व आचार

औषधिनिर्मितीबाबत सांडू बंधू फारच साक्षेपी होते. वापरण्यांत येणाऱ्या कच्च्या मालाची योग्य ऋतूंत निवड केली जाई. निर्मितीची कृति आयुर्वेदावरील ग्रंथांच्या आधारें ग्रंथोक्त पद्धतीनें बारीकसारीक कृतीनुसार व पाठाप्रमाणें तज्ज्ञ देखरेखीखालीं व्हावी याबाबत सांडू बंधू अत्यंत दक्षता घेत. प्रत्येक औषधाचा ग्रंथाधार त्या त्या औषधापुढें नमूद करण्यांत येत असे. तसेंच औषधिनिर्मितींत वापरण्यांत येणाऱ्या वनस्पतीआदि द्रव्यांचें परिमाण योग्य प्रकारें झालेलें आहे याचीहि ते खात्री करून घेत. पर्याय वापरून दुय्यम दर्जाची औषधिनिर्मिति करावयाची नाहीं, असा सांडू बंधूंचा कटाक्ष होता.

स्वतःला कारखान्याचे मालक न मानतां आपण ईश्वराच्या कृपेनें आयुर्वेदाच्या पुनरुज्जीवनाचें व त्याच्या प्रसाराचें कार्य करणारे विश्वस्त आहोंत हीच वृत्ति त्यांनीं बाळगली. म्हणून अत्यंत गरीबाला देखील माफक किंमतींत गुणकारी औषधें घेतां आली पाहिजेत या धोरणानें त्यांनीं आपल्या धंद्याची बैठक बसविली. अल्पावधींत अल्पमोली पण बहुगुणी सांडू औषधें विश्वासपात्र आहेत ही भावना जनतेंत निर्माण करण्यांत सांडू बंधूंनीं यश संपादन केलें.

ब्राह्मी तेलाची मूळ कल्पना ही सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील ग्रंथांच्या व्यासंगाचें व त्यांच्या कल्पकतेचें फळ आहे. सांडू बंधूंनीं टिकाऊ काढे तयार करण्याची रीत नव्यानें संशोधित करून अग्रपूजेचा मान मिळवला व केवळ महाराष्ट्राचेंच नव्हे तर अखिल भारताचें लक्ष त्यांनीं आपणाकडे वेधून घेतलें. या संशोधनाची नोंद आयुर्वेदाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनींच करावी इतकें महत्त्वाचें हें संशोधन आहे. कारण, आयुर्वेद औषधिनिर्मितीच्या व विक्रीच्या क्षेत्रांत त्यामुळें एक नवें दालन उघडलें गेलें.

### चेंबूरला स्थलांतर

कसलेंसें निमित्त होऊन वयाच्या केवळ चाळिसाव्या वर्षी इ. स. १९०३ सालीं श्री. दत्तात्रेय कृष्ण यांना काळानें ओढून नेलें. सांडू कुटुंबावर व कारखान्यावर ही अस्मानी आपत्ति फारच भयंकर होती. सांडू बंधूंनीं हतबल व निराश न होता कारखान्याचें व औषधिनिर्मितीचें कार्य श्री. दत्तात्रेय कृष्ण यांचा आदर्श डोळ्यापुढें ठेवून त्यांचेच नांवें मोठ्या जिद्दीनें पुढें चालविलें.

मागणी सतत वाढल्यामुळें ठाकुरद्वारची कारखान्याची जागा औषधिनिर्मिति व इतर कार्यालयीन व्यवस्था यांसाठी अत्यंत अपुरी पडूं लागली. म्हणून कारखान्याकरितां मुंबईबाहेर नवीन जागा शोधण्याचें काम सुरू झालें. श्री. रघुनाथ महाराज यांच्या सल्ल्यानें सांडू बंधूंनीं चेंबूर येथें बावीस हजार वार जागा विकत घेऊन इ. स. १९०८ सालीं तेथें कारखान्याचें प्रस्थान ठेवलें. आज पन्नास वर्षांनंतर, 'चेंबूर प्रति मुंबई होईल' हा श्रीसद्गुरु रघुनाथ महाराजांचा आशीर्वाद प्रत्ययास येत आहे हें नमूद केलें पाहिजे.

या सुमारास युरोपांत पहिल्या महायुद्धाचा भडका उडाला. महागडीं विदेशी औषधें घेण्यापेक्षा गुणकारी, स्वस्त व सोईच्या आयुर्वेदिक औषधांकडे जनमनाचा कल झुकला. या कालांत जनताजनार्दनानें अनंत हस्तें सांडू बंधूंच्या औषधांना उदार आश्रय दिला. सांडू औषधें घरगुती औषधें या सदरांत जमा झालीं. लोक तीं नेहमीं घरांत बाळगूं लागले. आयुर्वेदिक औषधांचा सर्रास वापर सुरू झाला. ही सुरुवात म्हणजे आयुर्वेद औषधिनिर्मितिच्या धंद्यांतील प्रगतीचा उषःकाल म्हटला पाहिजे.

### लिमिटेड कंपनींत रूपांतर

औषधिनिर्मितीसाठी १९१९ पासून तों १९३९ पावेतों त्यांनीं कारखान्याच्या आवारांत काढे सांठविणें, औषधांच्या भट्ट्या लावणें, बाटल्या व कच्चा माल सांठविणें, इत्यादि निरनिराळ्या विभागांसाठी मोठमोठ्या इमारती बांधून योग्य व्यवस्था केली. दूरदृष्टीनें निर्मिति, प्रचार आणि विक्रीच्या योजना आंखून त्या कार्यान्वित केल्या. दुर्दैवानें या कालांत संस्थेच्या संस्थापक सांडू बंधूंपैकीं आणखी तीन बंधूंना काळानें ओढून नेलें. ज्याला जमेल त्यानें वेळोवेळीं कर्णधाराची जागा घेऊन आंखून दिलेल्या दिशेनें कारखान्याचें तारूं पुढें चालविलें. कारखान्यास बाळसेदार स्वरूप येऊं लागलें. अशावेळीं कार्यालयीन कामाची, निर्मितीची आणि वांटपाची सुसूत्र व्यवस्था करण्याचे व कारखान्यास मानाचा दर्जा प्राप्त करून देण्याचे दृष्टीनें सांडू बंधूंनीं कालाचीं पावलें ओळखून इ. स. १९४० च्या फेब्रुवारी महिन्यांत या संस्थेचें लिमिटेड कंपनींत रूपांतर केलें. त्या अन्वयें आद्य संस्थापक सांडू बंधूंपैकीं सर्वांत कनिष्ठ श्री. गोविंद कृष्ण ऊर्फ आबासाहेब सांडू यांच्या अनुभवी व कुशल प्रबंध संचालकत्वाखालीं पहिलें संचालक मंडळ निवडून आयुर्वेद औषधिनिर्मितीच्या उद्योग-क्षेत्रांत संस्थेस चिरस्थायी रूप प्राप्त करून दिलें.

कंपनीच्या कारखान्यांत आज सर्व रोगांवर टिकाऊ काढे, स्वरस, आसवें, अरिष्टें, चूर्णें, गुटिका, भस्में, मात्रा, रसायनें, पाक, अवलेह, मुरंबे, तेलें, घृतें, मलमें, क्षार, द्राव, अर्क, सरबतें वगैरे निरनिराळ्या प्रकारचीं ७५० चे वर औषधें निर्माण केलीं जातात.

### ह्यापुढील कार्याची रूपरेषा

गेल्या शतकांत स्थापन झालेल्या या कंपनीच्या प्रगतीबाबत प्रशंसा होत असली तरी पण सांडू बंधूंना अजून या यशाबाबत समाधान वाटत नाहीं. लोकाश्रय व राजाश्रय मिळाला असला तरी पाश्चात्य विद्वानांच्याकडून आयुर्वेदाच्या श्रेष्ठत्वाची अशी कबुली मिळवावयासाठी जारीनें यत्न करावयास पाहिजेत. हें महत्त्वाचें कार्य अजून शिल्लक राहिलें आहे असे कंपनीचें प्रांजळ मत आहे. पाश्चात्य वैज्ञानिकांकडून किंवा शास्त्रज्ञांकडून आयुर्वेदीय चिकित्सा पद्धतीस व आयुर्वेदीय औषधांना मान्यता मिळवावयाची असल्यास आयुर्वेदीय औषधांचें प्रतिमानीकरण ( Standardisation ) होणें हा महत्त्वाचा प्राथमिक टप्पा आहे, अशी कंपनीची धारणा आहे; आयुर्वेदीय औषधि व्यापार व रुग्णचिकित्सा यांस प्रतिमानकिरण आधारभूत अंग आहे. प्रतिमानीकरण योग्य रीतीनें व त्वरित झाल्यास आयुर्वेदीय औषधिनिर्मितीच्या धंद्यांतील व आर्यवैद्यक व्यवसायांतील अनेक जटिल समस्या दूर होतील आणि पाश्चात्य वैज्ञानिकांकडून मान्यता मिळविण्याच्या मार्गांतील मोठी धोंड दूर होईल.

कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर



डॉ. रामकृष्ण हरि सांडू

प्रतिमानीकरण तीन टप्प्यांत सामावूं शकतें असें कंपनीस वाटतें. कच्च्या वनस्पतींचें प्रतिमानीकरण हा पहिला टप्पा म्हणतां येईल. औषधिनिर्मितीच्या प्रक्रिया व विधि यांचें प्रमाणीकरण करणें दुसऱ्या टप्प्यांत बसेल; आणि तिसरा व शेवटचा टप्पा म्हणजे तयार झालेल्या सर्व आयुर्वेदीय औषधांचें प्रतिमानीकरण करणें. हा फारच महत्वाचा टप्पा असून याच्या यशस्वितेसाठी पहिल्या व दुसऱ्या प्रकारांच्या प्रतिमानीकरणांची आवश्यकता आहे.

त्याचप्रमाणें आयुर्वेदाच्या विकासासाठी भारतांत आयुर्वेदीय शिक्षण, लेखन व चिकित्सापद्धति आणि संशोधन यांसाठी एकच विशिष्ट शब्दप्रणालि सरकारनें ठरविणें आवश्यक झालें आहे. कारण निरनिराळ्या प्रांतांतील वनस्पती, द्रव्यें, आदि औषधि घटकांना निरनिराळीं नांवें असल्यामुळें शिक्षणाच्या व लेखनाच्या एकसूत्रीकरणांत त्रास व गोंधळ माजला आहे. तसेंच पाश्चात्य धर्तीवर आयुर्वेदीय फार्माकोपिया तयार व्हावा असाहि सांडू बंधूंचा आग्रह आहे. शुद्ध व प्रमाणित आयुर्वेदीय वनस्पतींच्या उत्पादनाचा मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होणें व तयार झालेल्या वनस्पतींचा सांठा करून त्या आयुर्वेदीय औषधि निर्माण करणाऱ्या कारखान्यास पुरविण्यांत याव्यात या दृष्टीनें उपाययोजना अंमलांत आली पाहिजे.

तरी पण सरकारी यंत्रणा सुचेत होऊन कार्य सुरू होईपावेतों सांडू बंधु थांबण्यास तयार नाहींत. आपल्यापरी जें जें करतां येणें शक्य आहे तें तें करीत राहावें अशी त्यांच्या घराण्याची परंपरा असल्यानें त्यांनीं स्वतःचीच संशोधनासाठी एक प्रयोग-शाळा सुरू करण्याचें निश्चित ठरविलें आहे. त्यासाठी लागणारी यंत्रसामग्री व उपकरणीं मागविण्यांत आलीं असून तज्ज्ञ इसमांची नियुक्तीहि करण्यांत आली आहे. त्यांच्या देखरेखीखालीं आयुर्वेदीय वनस्पती व आयुर्वेदीय औषधांचें संशोधन सुरू आहे. हरिक महोत्सवाच्या समारंभाच्या निमित्तानें या प्रयोगशाळेचें जाहीर उद्घाटन झालें असून सांडू कुटुंबाच्या कर्तृत्वाच्या नव्या युगास प्रारंभ होत आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.